**<u>सं.फौ.ख.क्र.१९१/२०२१</u>**

**लक्ष्मी स्प्रे पेंटीग वि. तिरूपती ट्रान्सलाईन्स व इतर.**

**<u>निशाणी क्र.२४ अ च्या पुढे.</u>**

**<u>फिर्यादी साक्षीदार क्र.१ सुभाष जाधव यांचा उर्वरित उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे श्री.कोकरे, विधीज्ञ यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

तिरुपती ट्रान्सलाईन ही आरोपी क्र.२ व ३ यांनी स्थापन केलेली आहे. तिरुपती ट्रान्सलाईनचे काम आरोपी क्र.२ व ३ एकत्रात पाहत होते. ट्रान्सलाईनच्या बँकेचे व्यवहार आरोपी क्र.२ व ३ एकत्रात पाहत होते. धनादेशावर आरोपी क्र.३ ची मराठीत सही आहे. आरोपी क्र.२ ची सही इग्लीशमध्ये आहे. धनादेशावरील मजकूर इग्लीशमध्ये लिहिलेला आहे. चेक हा आरोपी क्र.२ ने लिहून मला दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ हा चेक देताना तेथे हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने दिलेल्या चेकचा गैरवापर करून खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ हा मला धनादेशातील रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

आरोपी क्र.३ तर्फे उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**(ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०९/०४/२०२६**